**R.C.S. No.31/2015**
**Sushila & Oth. .Vs. Soma & Oth.**

**Exh.48**

**Witness no.2. Sushila wd/o Rambhau Bhandarkar**

**वादी साक्षीदार क्र. २ चा पुढील सरतपास वादी तर्फे ॲड. श्री मांडवकर मार्फत शपथेवर सुरू–**

१. मी शपथेवर खरे सांगते की मी दाखल केलेले शपथपत्र **नि. ४८** वर माझी सही असून त्यावर माझे वकीलांची सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे.

२. मी विक्रीपत्र (नि. ४२) या प्रकरणात दाखल केले आहे. मी दाव्यातील शेतीचा ७/१२ उतारा नि. ३८ वर दाखल केला आहे. मी पटवारीचा नकाशा नि. ३९, फेरफार पंजी नि. ४०, अधिकार अभिलेख पंजी नि. ४१ वर दाखल केले आहे. मी पटवारी यांना केलेल्या तक्रार अर्जाची कार्यालयीन प्रत सादर केली असून त्यावर संबंधीत कार्यालयाचा सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी १०८** देण्यात येते.

**उलट तपास – प्रतिवादी क्र. १ (१) ते १ (५) तर्फे श्री पाटील यांच्या मार्फत सुरू**

३. मी मुळ विक्रीपत्र दाखल केलेले नाही. वादातील शेती आमच्या ताब्यात आहे. वादातील शेती प्रतिवादी यांच्या ताब्यात नाही. हे म्हणणे बरोबर

आहे की मे–१९९६ मध्ये माझे पती दाव्यातील शेतीचा कब्जा घेण्याकरिता प्रतिवादी कडे गेले होते. हे म्हणणे बरोबर आहे की तेंव्हा प्रतिवादींनी माझे पतीला दाव्यातील शेतीचा कब्जा घेवू दिला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की प्रतिवादीने कब्जा घेवू दिला नाही या कारणावरून माझे व माझे पतीचे भांडण झाले होते. हे म्हणणे बरोबर आहे की मी हा दावा दि. १५.११.२००८ रोजी दाखल केला होता. हे म्हणणे बरोबर आहे की मे–१९९६ पासून दावा दाखल करे पर्यंत १२ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की दाव्यातील मजकूर इंग्रजीमध्ये लिहिलेला असून मला तो माहित नाही. हे म्हणणे बरोबर आहे की मी मुदतीनंतर दावा दाखल केला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की मी मुदतीत दावा न केल्याने आता प्रतिवादी वाद शेताचे मालक झाले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की प्रतिवादी सोमा मरण पावल्यानंतर वाद शेती प्रतिवादी सोमाच्या मुलांच्या ताब्यात आहे. हे म्हणणे बरोबर नाही की मी निव्वळ खोटा दावा दाखल केला.

**उलट तपास – मुळ प्रतिवादी क. २ दु. १.३० वा.पर्यंत गैरहजर, त्यांच्या तर्फे कोणीही हजर नाही. सबब उलट तपास काही नाही.**

फेरतपास काही नाही.

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृती |
| स्वा/– | स्वा/– |
| (अ.वि.मिश्रा)<br>दिवाणी न्यायाधीश व.स्तर<br>उमरेड<br>दि. १४.०२.२०२३ | (अ.वि.मिश्रा)<br>दिवाणी न्यायाधीश व.स्तर<br>उमरेड |